# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.06.2025** **वारःशनिवार**

---

1. इराण-इस्रायल दरम्यान संघर्ष तीव्र, इराणकडून काल रात्री इस्रायलवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला
2. भारत आणि इस्रायलच्या पंतप्रधानांदरम्यान सद्यपरिस्थितीबाबत चर्चा
3. अहमदाबादच्या अपघातग्रस्त विमानचा ब्लॅक बॉक्स हस्तगत, अपघातात चार वैद्यकीय विद्यार्थ्यांचाही मृत्यू
4. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज दिल्लीत योग कनेक्ट जागतिक शिखर परिषदेला सुरुवात
5. क्रिप्टो चलनातील गुंतवणुकीसंदर्भात सीबीडीटीकडून उच्च जोखीम असलेल्या व्यक्तींची चौकशी आणि
6. जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत दक्षिण अफ्रिकेचा विजयाच्या उंबरठ्यावर

**<u>इस्रायल-इराण</u>**

इराणने काल रात्री इस्रायलला प्रत्युत्तर म्हणून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला केला. तेहरानने या हल्ल्याला गंभीर शिक्षा अशा अर्थी 'ऑपरेशन सिव्हिअर पनिशमेंट' असे संबोधले आहे. या हल्ल्यामुळे इस्रायलमध्ये हवाई हल्ल्याचे सायरन वाजले आणि तेल अवीव, जेरुसलेम इथं मोठ्या प्रमाणात स्फोट झाले. यामुळे लाखो नागरिकांना जीव वाचविण्यासाठी आश्रय शोधावा लागला. इराणच्या अण्वस्त्र विकास कार्यक्रमाला थोपवण्यासाठी केलेल्या इस्रायलच्या हल्ल्यानंतर काहीच तासांत इराणने हा हल्ला चढवला. या हल्ल्यात इराणच्या भूमिगत नतांझ या अण्वस्त्र स्थळाला लक्ष्य करण्यात आले होते, त्याठिकाणच्या इस्लामिक रिव्हॉल्यूशनरी गार्डसह अनेक वरिष्ठ लष्करी अधिकारी हल्ल्यात ठार झाले.

इस्रायलमधील बेन गुरियन विमानतळ तत्काळ बंद करण्यात आले असून, संपूर्ण देशात सतर्कता बाळगली जात आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांनी इस्रायलने सुरू केलेल्या युद्धाचा बदला वेदनादायक असेल, इस्रालयमध्ये काहीही सुरक्षित वाचणार नाही असे जाहीर केले आहे. इराणच्या स्थानिक माध्यमांनी या हल्ल्याचे वर्णन विनाशकारी प्रत्युत्तराची सुरूवात असे वर्णन केले आहे. इराणी सैन्य लष्करी कारवायांसाठी तैनात असल्याचं रिव्हॉल्युशनरी गार्डस् म्हटलं आहे. तर इस्रालयचे संरक्षण मंत्री काट्झ यांनी इराणने जाणीवपूर्वक अधिक लोकसंख्या असलेल्या नागरी परिसराला लक्ष्य करून लाल रेषा ओलांडली असल्याचा आरोप केला असून या हल्ल्याला इस्रायल जबरदस्त प्रत्युत्तर देईल असा इशारा दिला आहे.

**<u>पंतप्रधान-इस्रायल</u>**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियामध्ये निर्माण होणाऱ्या परिस्थितीबाबत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. पंतप्रधानांनी समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात याविषयीची काळजी व्यक्त करतानाच प्रदेशात लवकरात लवकर शांतता आणि स्थिरता नांदण्याच्या

गरजेवर भर दिला आहे. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही काल इस्रायलचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांच्यासोबत सद्यस्थितीसंदर्भात दूरध्वनीवरून संवाद साधला.

**विमान अपघात**

अहमदाबादमध्ये शुक्रवारी अपघातग्रस्त झालेल्या विमानाचा फ्लाइट डेटा रेकॉर्डर अर्थात ब्लॅक बॉक्स काल सापडला असून याद्वारे अपघातापूर्वीच्या परिस्थितीवर प्रकाश पडू शकेल, अशी अपेक्षा आहे. अपघाताच्या पार्श्वभूमीवर Genx इंजिन असलेल्या बोइंग 787 विमानांची अतिरीक्त सुरक्षा चाचणी करण्याचे निर्देश विमान वाहतूक महासंचालकांनी एअर इंडियाला दिले आहेत. मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरू असून आतापर्यंत डीएनएचे सुमारे 200 नमुने गोळा करण्यात आले आहेत. सात मृतदेह नातवाईकांकडे सोपवण्यात आले आहेत. अपघातानंतर या भागातल्या काही स्थानिकांचा ठावठिकाणा लागत नसून त्यांचाही शोध घेतला जात आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अहमदाबाद सरकारी रुग्णालयात जाऊन विमान अपघातात जखमी झालेल्या प्रवाश्यांची भेट घेतली. अपघातातून बचावलेले एकमेव प्रवासी रमेश विश्वासकुमार यांचीही त्यांनी विचारपूस केली. तसंच दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबियांची त्यांनी भेट घेतली. त्यानंतर मोदी यांनी बैठक घेऊन बचाव कार्याचा आढावा घेतला. अपघातग्रस्त भागामध्ये आपत्ती व्यवस्थापन आणि लष्कराच्या मदतीला सामान्य नागरिकही पुढे सरसावले आहेत. रक्तदान करण्यासाठी अनेकजण पुढे येत असून प्रवाशांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था केली जात आहे.

**विमान अपघात समिती**

अहमदाबाद विमान अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यासाठी सरकारनं एक उच्चस्तरीय बहुशाखीय समितीची स्थापना केली आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं समाज माध्यमांवरून दिलेल्या संदेशात, ही समिती अशा घटना रोखण्यासाठी जारी करण्यात आलेल्या विद्यमान मानक कार्यप्रणाली आणि मार्गदर्शक तत्वांची तपासणी करेल. तसेच संभाव्य घटनांना सामोरे जाण्यासाठी व्यापक मार्गदर्शक तत्व सुचवेल असं म्हटलं आहे.

**विमान-मृत्यू**

अहमदाबाद विमान अपघातात, चार वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि एका डॉक्टरांच्या पत्नीचा मृत्यू झाल्याची माहिती गुजरातच्या भारतीय वैद्यकीय संघटनेचे अध्यक्ष मेहुल शहा यांनी दिली आहे. यामध्ये 45 वैद्यकीय विद्यार्थ्यांना वाचवण्यात यश आल्याचंही त्यांनी सांगितलं.

**योग परिषद**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर 'योग कनेक्ट' या जागतिक शिखर परिषदेला आजपासून नवी दिल्ली इथं सुरुवात होत आहे. आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या या परिषदेची संकल्पना 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही आहे. देश परदेशातील सुमारे एक हजार अभ्यासक या परिषदेत भाग घेणार आहेत. जगभरातल्या आंतरराष्ट्रीय योग संस्थांचे प्रतिनिधी दूरस्थ पद्धतीनं उपस्थित राहतील. अमेरिका, युनायटेड किंग्डम, दक्षिण कोरिया आणि बाहरीनमधील तज्ञही परिषदेत सहभागी होणार आहेत. 'आंतरराष्ट्रीय योग दिनाचा गेल्या दशकातील प्रभाव' या विषयावरचा अहवाल परिषदेच्या निमित्तानं प्रसिद्ध केला जाणार असून 'योगशिक्षण आणि योगाभ्यासाचा लाभ' या विषयावर सत्रं घेण्यात येणार आहेत.

**उर्जापुरी**

देशात आगामी काही महिने पुरेल इतका पुरेसा उर्जा साठा असल्याचं केंद्रीय पेट्रोलियन आणि भूगर्भ वायू मंत्री हरदीप पुरी यांनी काल सांगितलं. पेट्रोलियम सचिव आणि भारतीय उर्जा सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमांच्या प्रमुखांसोबत त्यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीनंतर समाजमाध्यमांवरून दिलेल्या संदेशात त्यांनी ही माहिती दिली आहे. इराण- इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभुमीवर काल आंतरराष्ट्रीय तेलाच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याच्या पार्श्वभुमीवर ही बैठक घेण्यात आली. देशात दरवर्षी दीडशे अब्ज अमेरिकन डॉलर्सची उर्जा आयात होते त्यामध्ये 80 टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलाचा समावेश आहे. सध्या देशात पंतप्रधानांच्या वेगवान नेतृत्वाखाली उपलब्धता, किफायतशीर किंमत आणि शाश्वत उर्जा या त्रिसुत्रीवर आधारीत उर्जा रणनीती आखली जात असल्याचं पुरी यांनी नमूद केलं आहे.

**सीबीडीटी कर चोरी**

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ म्हणजेच सीबीडीटी, क्रिप्टो चलनातील गुंतवणूक करणाऱ्या उच्च जोखीम व्यक्तींच्या करचोरी आणि बेहिशोबी उत्पन्नाच्या स्त्रोतांची चौकशी करत आहे. मंडळाच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, व्हर्च्युअल डिजीटल मालमत्ता म्हणजेच व्हीडीए व्यवहारांमध्ये गुंतलेल्या आणि प्राप्तीकर अधिनियम 1961 चे पालन न करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींच्या पडताळणीसाठी ओळख पटवण्यात आली आहे. या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर, प्राप्तीकराचा व्हीडीए दाखल न करणाऱ्यांची आणि मिळवलेल्या उत्पन्नावर कमी कर आकारण्याचा प्रस्ताव देणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे त्यामुळे प्राप्तीकर कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन होते. सीबीडीटीने हजारो दोषी प्राप्तीकर दात्यांना विवरण पत्रांचा आढावा घेऊन ताजी माहिती देण्याचे निर्देश इमेलद्वारे दिले असल्याचंही सुत्रांनी सांगितले.

**नेपाळ हवाई सुरक्षा**

नेपाळच्या राष्ट्रीय सभेच्या सदस्यांनी विमान प्रवास सुरक्षितता आणि भेटीसाठीचा व्हिसा यांसह विविध समकालीन मुद्द्यांवर सरकारचं लक्ष वेधले. भारतात झालेल्या विमान अपघातासंदर्भात चर्चा करताना, नेपाळमधील विमान वाहातूक क्षेत्रातील समस्या दूर करण्याबाबत सरकारचे लक्ष वेधण्यात आले. वरिष्ठ सभागृहातील काँग्रेसचे अध्यक्ष कृष्ण बहादूर रोकाया यांनी या क्षेत्रातील तांत्रिक आणि धोरणात्मक सुधारण करण्यावर भर दिला. तांत्रिक, धोरणात्मक आणि भू-राजकीय कमकुवतपणामुळे युरोपियन महासंघाने 2013 पासून युरोपियन हवाई क्षेत्रात नेपाळ एअरलाईन्सवर बंदी घातली आहे.

**नेमबाजी**

जर्मनीत सुरू असलेल्या विश्वकरंडक नेमबाजी स्पर्धेत, भारताच्या सुरूची सिंगने 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. सुरूचीचं हे सलग तिसरे वैयक्तिक सुवर्णपदक आहे. यामुळे स्पर्धेत भारताच्या पदकांची संख्या तीनवर पोहोचली आहे.

**कसोटी क्रिकेट**

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत लंडनमध्ये लॉर्ड्स मैदानावर सुरू असलेल्या अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिकेचा संघ अजिंक्यपदाच्या जवळ पोचला आहे. तिसऱ्या दिवसाच्या खेळावर काल दक्षिण अफ्रिकेच्या संघाचं वर्चस्व दिसून आलं. स्पर्धेत अजिंक्य राहाण्यासाठी दक्षिण अफ्रिकेला 69 धावांची आवश्यकता

असून, त्यांचे आठ खेळाडू शिल्लक आहेत. तिसऱ्या दिवसाअखेर दक्षिण अफ्रिकेनं दोन गडी बाद 213 धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियानं दोन डावांत 212 आणि 207 धावा केल्या
आहेत.

**हवामान**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं राजस्थानसाठी लाल बावटा जारी केला असून पुढील दोन ते तीन दिवस उष्णतेची तीव्र लाट कायम राहील, असं म्हटलं आहे. पुढच्या 48 तासांसाठी उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा जम्मू, हरियाणा आणि मध्यप्रदेशसाठीही देण्यात आला आहे. दरम्यान, नवी दिल्लीमधील उष्णतेच्या लांटेची तीव्रता काही प्रमाणात घटली आहे. आधीच्या 45 अंश सेल्सियसपेक्षा इथल्या तापमानात 3 ते 4 अंशांनी घट झाली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.